International Year of Cooperatives
2025

महाराष्ट्र शासन

**महाराष्ट्र राज्य बिगर कृषी सहकारी पतसंस्था नियामक मंडळ,**
**तथा सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय**
**नविन मध्यवर्ती इमारत, दुसरा मजला, ५, बी.जे.रोड, पुणे-४११००१.**

दूरध्वनी क्र.: २६१२२८४६/४७ Email - patsanstharegulatoryboard@gmail.com

जा.क्र.सआ-५/पत/वार्षिक अहवाल प्रकटीकरण/२४३५/२०२५ दिनांक : २६ सप्टेंबर, २०२५

# परिपत्रक

**राज्यातील बिगर कृषी सहकारी पतसंस्थांना ताळेबंद / नफा तोटा पत्रक / वार्षिक अहवालाचे प्रसिद्धी / प्रकटीकरणबाबत मार्गदर्शक सूचना निर्गमित करणे.**

**प्रस्तावना :**

नागरी सहकारी पतसंस्था व बिगरशेती सहकारी पतसंस्था तसेच पगारदार पतसंस्था या आर्थिक क्षेत्रात महत्वाची भूमिका पार पाडत असल्याने त्यांच्या लेखापध्दतीत एकसूत्रीपणा व पारदर्शकता आणून सभासद व ठेवीदारांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी तसेच या संस्था आर्थिकदृष्ट्या सक्षम होण्यासाठी यापूर्वीपासून पतसंस्थांना लागू असणाऱ्या निकषांबाबतीत अधिक स्पष्टता करणे अत्यंत आवश्यक झाले आहे. राज्यातील पतसंस्थांवरील जनतेचा विश्वास वाढण्याच्या दृष्टीने तसेच सहकार चळवळीस पोषक वातावरण निर्माण होण्यास्तव पतसंस्थांचे ताळेबंद आणि नफातोटा पत्रक (हिशेब पत्रके) यामध्ये संबंधीत संस्थांची योग्य व रास्त आर्थिक स्थिती दर्शविण्यासाठी तसेच वार्षिक अहवालामध्ये एकवाक्यता व पारदर्शकता येण्यासाठी सहकार कायद्यातील तरतुदी तसेच लागू असणाऱ्या लेखा मानकांचे (अकौंटिंग स्टँडर्ड) पालन केल्याचे वित्तीय विवरणपत्रे व वार्षिक अहवालामध्ये प्रतिबिंबित होण्याचे दृष्टीने याबाबत सर्व मार्गदर्शक तत्त्वे/सूचना/ निर्देश एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्यासाठी, या विषयावरील सुसंगत परिपत्रकीय सूचना निर्गमित करण्यात येत आहेत.

सदर बाबत या कार्यालयाद्वारे वेळोवेळी निर्गमीत संबंधित सुचना अधिक्रमित करण्यात येत आहेत. यापुर्वी निर्गमीत सर्व परिपत्रके व सुचना रद्द करण्यात आलेल्या असल्या तरीही,यापुर्वी निर्गमित परिपत्रक/ सुचनांन्वये कोणत्याही प्रकारची कारवाई सुरू असेल किंवा प्रलंबित असेल,अशा प्रकरणी पूर्वीच्या परिपत्रकातील तरतुदी व सुचनांनुसार त्या बाबतीत अंतिम कारवाई सुरू राहील.

या परिपत्रकातील सूचना या अंतिम नसून या व्यतिरिक्त बिगर कृषी सहकारी पतसंस्थांनी अन्य कायदे किंवा अन्य बाबींनुसार बंधनकारक असलेली माहिती देखील प्रगटीकरण व प्रसिद्धीकरण करणे आवश्यक आहे.

**व्याख्या :-**

**<u>ताळेबंद पत्रक:-</u>**

ताळेबंद म्हणजे एखाद्या विशिष्ट तारखेला, जसे की आर्थिक वर्षाच्या शेवटी प्रत्येक संस्थेची मालमत्ता, दायित्वे आणि स्वनिधी याचे आधारावर आर्थिक आरोग्य आणि स्थिती समजून घेण्यासाठी हे एक महत्त्वाचे साधन आहे.

यामध्ये विशिष्ट तारखेनुसार मालमत्ता आणि दायित्वांचे विवरणपत्र असून व्यवसायाचे निधी कसे उभारले जातात आणि ते कसे वापरले जातात हे प्रतिबिंबित होते.

**<u>नफा आणि तोटा पत्रक:-</u>**

नफा आणि तोटा पत्रक हे केवळ चालू वर्षासाठी व्यवसायाचे उत्पन्न आणि खर्च दर्शविणारे विवरणपत्र असून विशिष्ट कालावधीत संस्थेचे उत्पन्न आणि खर्च यांच्या सारांश रूपाने संस्थेला नफा झाला की तोटा झाला हे दर्शवते.

वरील दोन्ही आर्थिक पत्रके व्यवसायाच्या आर्थिक कामगिरीचा आढावा घेण्यास आणि नफ्याचे विश्लेषण करण्यासाठी उपयुक्त असल्याने ती अधिक अचूक होण्याचे दृष्टीने संस्थेने या परिपत्रकातील सूचनांचे काटेकोर पालन करावे.

**<u>ताळेबंद व नफातोटा पत्रक (हिशोब पत्रके) संबंधीत महाराष्ट्र सहकारी संस्था नियम, १९६१ मधील तरतुदी:-</u>**

**<u>म.स.सं.नियम १९६१ मधील नियम ४९(अ) :--</u>**

संस्थेने निव्वळ नफा निर्धारित करताना कोणत्या गोष्टीची वजावट करणे अनिवार्य आहे याची तपशीलवार यादी या नियमात दिली आहे. संस्थेचा निव्वळ नफा वस्तुस्थिती दर्शक असण्यासाठी सर्व खर्च रकमा निव्वळ नफा निर्धारित करण्यापूर्वी नफा तोटा खाती खर्ची पडणे आवश्यक आहे.

सदर नियमात नमूद खर्च रक्कम हि निव्वळ नफा विनियोगातून करणे अपेक्षित नाही. मात्र संस्थेचा निव्वळ नफा निर्धारित करण्यापूर्वी यातील नमूद कोणत्याही खर्चाची पुरेशी तरतूद केली असल्यास निव्वळ नफा विनियोगातून अशी तरतूद करण्यास हरकत नाही.

निव्वळ नफा निर्धारित करण्यापूर्वी अशी पुरेशी तरतूद न करता निव्वळ नफ्यातून तरतूद केल्यास हे या नियमाचे उल्लंघन समजणेत येईल व याची विशेष नोंद लेखापरीक्षण अहवाल व वर्गवारी दाखल्यामध्ये वैधानिक लेखापरीक्षकांनी करणे अनिवार्य राहील.

निव्वळ नफा निर्धारित करण्यापूर्वी ढोबळ नफ्यातून महाराष्ट्र सहकारी संस्था नियम, १९६१ मधील नियम ४९ (अ) मधील नमूद खर्च रक्कम तरतुदी केल्या असल्यास, त्याचा कोणताही विनियोग करण्यासाठी साधारण सभा अथवा निबंधक यांच्या मान्यतेची आवश्यकता नाही मात्र निव्वळ नफा वितरणामधून नियम ४९(अ) मधील नमूद कोणत्याही खर्च रक्कमेची तरतुद केली असल्यास साधारण सभा तसेच आवश्यकते नुसार निबंधक यांची पूर्व मंजुरी आवश्यक राहील.

संस्थेने ढोबळ व निव्वळ नफ्यातून आजपर्यंत केलेल्या तसेच यापुढे करणार असलेल्या म.स.सं.नियम १९६१ मधील नियम ४९(अ) मधील नमूद खर्च रक्कम तरतुदी ताळेबंदामध्ये स्वतंत्रपणे दाखवणे आवश्यक असून, ज्या योगे यामधील होणारी हालचाल निबंधक, लेखापरीक्षक तसेच सभासद /ठेवीदार यांना प्रथमदर्शनी दिसेल. अशा प्रकारे केलेली वर्गवारी वैधानिक लेखापरीक्षक यांनी प्रतिवर्षी तपासणे आवश्यक असून त्यामध्ये त्रुटी असल्यास तशा निष्कर्ष/शेरा त्यांचे अहवालात नमूद होणे आवश्यक आहे.

**म.स.सं.नियम १९६१ मधील नियम ६१ :-—**

प्रत्येक संस्थेच्या संचालक मंडळाने ताळेबंद इत्यादींसह वार्षिक विवरणपत्रे प्रत्येक सहकारी वर्ष संपल्यापासून पंचेचाळीस दिवसांच्या आत किंवा निबंधकांनी निर्दिष्ट केलेल्या वाढीव कालावधीत तयार करणे बंधनकारक असून त्याची एक प्रत, ती तयार झालाच्या तारखेपासून पंधरा दिवसांच्या आत, त्या संस्थेने अथवा निबंधकांनी नियुक्त केलेल्या वैधानिक लेखापरीक्षकाकडे परीक्षणासाठी सादर करणे अनिवार्य आहे.

या संदर्भात संस्थेच्या संचालक मंडळाकडून ताळेबंदासह वार्षिक विवरणपत्रे त्यांचे संचालक मंडळ सभेत मान्य होतील, तीच तारीख त्यांनी सदर विवरणपत्रे तयार केल्याची तारीख समजणेत येईल. तसेच वैधानिक लेखापरीक्षकांनी ज्या तारखेला सदर बाबतीत पोहोच दिली आहे, तीच तारीख त्यांना हि विवरणपत्रे मिळाल्याची तारीख गृहीत धरण्यात येईल.

**म.स.सं.नियम १९६१ मधील नियम ६२ :-**

महाराष्ट्र सहकारी संस्था नियम, १९६१ मधील नियम ६२ (१) अन्वये प्रत्येक संस्थेने ताळेबंद व नफा तोटा पत्रक नमुना "न" मध्ये तयार करणे बंधनकारक असून सहकार आयुक्त व निबंधक यांचे पूर्व परवानगीनेच संस्थेला या नमुन्या मध्ये बदल करता येईल.

सदर नमुन्यामध्ये ताळेबंद व नफा तोटा पत्रक प्रसिद्ध न केल्यास ते कायद्याचे उल्लंघन समजणेत येईल याची नोंद घ्यावी. अशा प्रकारे केलेले उल्लंघन आढळल्यास वैधानिक लेखापरीक्षक यांनी तशा निष्कर्ष/शेरा त्यांचे अहवालात नमूद करणे आवश्यक आहे.

नियम ६२ (२) अन्वये वैधानिक लेखापरीक्षक यांनी प्रमाणित केलेले ताळेबंद व नफा तोटा पत्रक वार्षिक साधारण सभेच्या ठरलेल्या तारखेपूर्वी किमान चौदा दिवस अगोदर संस्थेच्या सूचना फलकावर लावणे बंधनकारक राहील.

**म.स.सं.नियम १९६१ मधील नियम ६५ :-**

प्रत्येक संस्थेने यामध्ये विनिर्दिष्ठ केलेल्या यादीनुसार लेखे आणि पुस्तके ठेवणे बंधनकारक आहे.

**म.स.सं.नियम १९६१ मधील नियम ६७ :-**

महाराष्ट्र सहकारी संस्था नियम, १९६१ मधील नियम ६७ मध्ये निबंधक यांना सादर करावयाची सर्व प्रकारची विवरणपत्रे विहित नमुन्यात व पद्धतीने तसेच निर्धारित मुदतीत सादर न केल्यास हि विवरणपत्रे सादर करण्यास संबधित अधिकारी अथवा पदाधिकारी जबाबदार आहेत.

सर्व प्रकारची विवरणपत्रे विहित नमुन्यात व पद्धतीने तसेच निर्धारित मुदतीत सादर न केल्यास ते कायद्याचे उल्लंघन समजणेत येईल याची नोंद घ्यावी. अशाप्रकारे केलेले उल्लंघन आढळल्यास वैधानिक लेखापरीक्षक यांनी तशा निष्कर्ष/शेरा त्यांचे अहवालात नमूद करणे आवश्यक आहे.

**विंडो ड्रेसिंग :-**

ताळेबंद आणि नफा आणि तोटा खाते त्यांच्या आर्थिक स्थितीचे खरे आणि निष्पक्ष चित्र प्रतिबिंबित करते. संस्थेने या बाबतीत विंडो ड्रेसिंग करून सत्य परिस्थिती लपवून आर्थिक पत्रके तयार करू नयेत.

वैधानिक लेखापरीक्षक यांनी अशा प्रकारचे विंडो ड्रेसिंग झाले नसल्याची खात्री करावी. तसेच असे विंडो ड्रेसिंग निदर्शनास आल्यास, त्याची गांभीर्याने नोंद घेऊन त्या बाबतीत लेखापरीक्षण अहवालामध्ये 'अ' भागामध्ये गंभीर दोष म्हणून स्वतंत्र निष्कर्ष नोंदवावेत.

सदर बाब म.स.सं.अधिनियम १९६० व नियम १९६१ च्या तरतुदींनुसार योग्य त्या कारवाईस पात्र राहील याची कृपया संबधित संस्था व वैधानिक लेखापरीक्षक यांनी नोंद घ्यावी.

## अकाउंटिंग स्टँडर्डस्:-

प्रत्येक संस्थेने ताळेबंद इत्यादींसह वार्षिक विवरणपत्रे तयार करताना प्रचलित व लागू असणाऱ्या सर्व अकाउंटिंग स्टँडर्डस् चे संस्थेने पालन करणे आवश्यक असून, अशा सर्व अकाउंटिंग स्टँडर्डस् चे संस्थेने पालन केले असल्याची वैधानिक लेखापरीक्षक यांनी खात्री करणे अनिवार्य आहे. अशा प्रकारचे प्रचलित व लागू असणाऱ्या सर्व अकाउंटिंग स्टँडर्डस् चे संस्थेने पालन झाले नसल्याचे निदर्शनास आल्यास त्याची गांभीर्याने नोंद घेऊन त्या बाबतीत लेखापरीक्षण अहवालामध्ये स्वतंत्र निष्कर्ष नमूद करावेत.

सदर बाबत उल्लंघन झाल्यास म.स.सं.अधिनियम १९६० व नियम १९६१ च्या तरतुदींनुसार संस्था व वैधानिक लेखापरीक्षक योग्य त्या कारवाईस पात्र राहतील याची कृपया संबधित संस्था व वैधानिक लेखापरीक्षक यांनी नोंद घ्यावी.

भारतीय हिशोब मानांकन निकष (अकाउंटिंग स्टँडर्ड) मुळे संस्थेच्या अकाउंटिंग पॉलिसी किंवा हिशोब धोरणातील बदलामुळे कोणते परिणाम झाले आहेत हे जाहीर करावे लागणार आहे. यामुळे संस्थेची वास्तव व खरी आर्थिक स्थिती समजण्यास मदत होईल.

संस्थेला कॅश फ्लो स्टेटमेंट देखील प्रसिद्ध करावे लागल्याने संस्थेची तरलता परिस्थिती समजण्यास मदत होईल.

गतवर्षी अथवा पुढील वर्षी होणाऱ्या उत्पन्नाचा खर्चाचा परिणाम चालू आर्थिक वर्षाच्या नफा तोट्यावर झाला असल्यास त्याची देखील माहिती यामध्ये द्यावी लागणार आहे.यामुळे वास्तव नफा समजून येईल .

घसारा पद्धतीमध्ये बदल केला असल्यास ते देखील नमूद करावे लागेल.

अनुत्पादक जिंदगीच्या बाबतीत उत्पन्न मान्य संकल्पनेच्या संदर्भात देखील (इन्कम रेकग्नेशन) माहिती द्यावी लागणार असल्याने खरे उत्पन्न समजेल

एखादी संस्था विलिनीकरण करून घेतली असल्यास त्या संदर्भातील माहिती द्यावी लागेल.

संस्थेच्या एकूणच गुंतवणुकीबाबत नेमके हिशोब कसे केले आहेत त्या संदर्भातली हिशोबाची माहिती द्यावी लागणार आहे.

यामधील केवळ काही महत्वाची माहिती उदाहरणादाखल वर दिली असून संस्थेला आता भारतीय हिशोब मानांकन निकष (अकाउंटिंग स्टँडर्ड) नुसार सर्व हिशोब पद्धती ठेवावी लागणार असल्याने, प्रत्येक संस्थेने अकाउंटिंग पॉलिसी च्या संदर्भात धोरण देखील ठरवणे अधिक उचित होईल. यामुळे सर्वच संस्थांच्या हिशोब पद्धतीमध्ये एकवाक्यता व समानता येणार आहे.

या संदर्भात वैधानिक लेखापरीक्षण अहवाल आदर्श नमुना संबधित दि.०४.०४.२०२२ रोजी निर्गमित केलेल्या परिपत्रकात देखील अकाउंटिंग स्टँडर्ड पूर्तते बाबतीत तपशील दिलेला आहे.

## नोट्स टू अकाउंट:-

प्रत्येक संस्थेने याबाबत त्यांचे वार्षिक अहवालात स्वतंत्र परिशिष्ट जोडणे बंधनकारक असून या परिशिष्टावर संस्थेचे वतीने व्यवस्थापक /मुख्य कार्यकारी अधिकारी व वैधानिक लेखापरीक्षक यांचे संयुक्त सहीने प्रसिध्द करणे बंधनकारक आहे.

यामध्ये प्रसिद्ध होणारी माहिती ही दोन आर्थिक वर्षांची (सलगचे मागील व चालू ) तुलनात्मक माहिती प्रसिद्ध करणे बंधनकारक राहील.

या परिशिष्टामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या माहिती व्यतिरिक्त अधिक माहिती संस्थेला देण्याबाबत कुठलेही बंधन नाही.

(आकडेवारी लाखात )

| अ.क्र | तपशील | चालू आर्थिक वर्ष | मागील आर्थिक वर्ष |
|---|---|---|---|
| **१** | **भांडवल पर्याप्तता** | | |
| अ | स्वनिधी रक्कम | | |
| ब | जोखीम भारांकन रक्कम | | |
| क | भांडवल पर्याप्तता (CRAR) शेकडा प्रमाण % | | |
| **२** | **सी.आर.आर. प्रमाण %** | | |
| **३** | **स्वनिधी रक्कम हालचाल** | | |
| अ | आरंभीची शिल्लक —रक्कम | | |
| ब | अधिक- या आर्थिक वर्षातील वाढ रक्कम | | |
| क | वजा — या आर्थिक वर्षातील उचल रक्कम | | |
| ड | अखेरची शिल्लक रक्कम | | |
| **४** | **गुंतवणूक** | | |
| अ | एस.एल.आर.गुंतवणूक रक्कम | | |
| ब | नॉन एस.एल.आर.गुंतवणूक रक्कम | | |
| क | जिल्हा/राज्य.बँक भाग गुंतवणूक रक्कम | | |
| ड | अनुत्पादक गुंतवणूक रक्कम | | |
| इ | अनुत्पादक गुंतवणूक घसारा तरतूद रक्कम | | |
| **५** | **एस.एल.आर. प्रमाण %** | | |
| **६** | **अनुत्पादक कर्जे** | | |
| अ | निव्वळ एन पी ए शेकडा प्रमाण % | | |
| ब | ढोबळ एन पी ए शेकडा प्रमाण % | | |
| क | निव्वळ एन पी ए रक्कम | | |
| ड | दुय्यम कर्जे (सब-स्टँडर्ड) एकूण येणे रक्कम | | |
| इ | संशयित-1 कर्जे (डी.1)एकूण येणे रक्कम | | |
| ई | संशयित-2 कर्जे (डी.2)एकूण येणे रक्कम | | |
| फ़ | संशयित-3 कर्जे (डी.3)एकूण येणे रक्कम | | |
| ग | बुडीत कर्जे(लॉस) एकूण येणे रक्कम | | |
| घ | ढोबळ एन पी ए एकूण येणे रक्कम | | |
| **७** | **तारणी/विनातारणी ढोबळ एन पी ए प्रमाण%** | | |
| अ | ढोबळ एन पी ए मधील तारणी रक्कम शेकडा प्रमाण% | | |
| ब | ढोबळ एन पी ए मधील विनातारणी रक्कम शेकडा प्रमाण% | | |
| **८** | **अनुत्पादक कर्जे व गुंतवणूक वगळून इतर मालमत्ता एन पी ए तरतूद रक्कम** | | |
| **९** | **तारणी /विनातारणी कर्ज प्रमाण %** | | |
| अ | तारणी कर्ज रक्कम शेकडा प्रमाण % | | |
| ब | विनातारणी कर्ज प्रमाण % | | |
| **१०** | **निव्वळ नफ्यातून केलेली नियम 49 (अ)** | | |

| | | | |
|---|---|---|---|
| | **मधील नमूद खर्च तरतूद रक्कम** | | |
| **११** | **अपहार/गैरव्यवहार रक्कम हालचाल** | | |
| अ | आरंभीची शिल्लक रक्कम | | |
| ब | अधिक- या आर्थिक वर्षातील वाढ रक्कम | | |
| क | वजा – या आर्थिक वर्षातील वसुली रक्कम | | |
| ड | अखेरची शिल्लक रक्कम | | |
| **१२** | **सरासरी ठेव व्याज खर्च शेकडा प्रमाण %** | | |
| **१३** | **सरासरी कर्ज व्याज उत्पन्न शेकडा प्रमाण %** | | |
| **१४** | **सरासरी गुंतवणूक व्याज उत्पन्न शेकडा प्रमाण %** | | |
| **१५** | **नॉन बँकिंगअसेट(एनबीए)** | | |
| अ | एकूण येणे रक्कम | | |
| ब | यापोटीची स्वतंत्र एकूण तरतूद रक्कम | | |
| **१६** | **जोखीम केंद्रीकरण शेकडा प्रमाण** | | |
| अ | एकूण ठेवींमध्ये सर्वात मोठ्या वीस ठेवीदारांच्या ठेव रकमेची टक्केवारी--% | | |
| ब | एकूण कर्जामध्ये सर्वात मोठ्या वीस कर्जदारांच्या कर्ज रकमेची टक्केवारी% | | |
| क | बँकेच्या एकूण ढोबळ एनपीएमध्ये सर्वात मोठ्या वीस एनपीए कर्जदार यांचे ढोबळ एनपीएरकमेची टक्केवारी % | | |
| **१७** | **परिचलन (ऑपरेटिंग) नफ्याचे सरासरी खेळत्या भांडवलाशी शेकडा प्रमाण %** | | |
| **१८** | **निव्वळ नफ्याचे सरासरी खेळत्या भांडवलाशी शेकडा प्रमाण %** | | |
| **१९** | **सी. डी.रेशो प्रमाण %** | | |
| **२०** | **प्रशासकीय व आस्थापना खर्चाचे खेळते भांडवलाशी प्रमाण %** | | |

वरील सर्व माहितीवरून सदर संस्थेचा प्रवास कोणत्या दिशेने चालला असून संस्थेने कोणकोणत्या क्षेत्रात अधिक जोखीम घेतली आहे हे सदर संस्था, तसेच निबंधक व सर्व सामान्य सभासद यांना समजणेस मदत होणार आहे. यातील कोणतीही आकडेवारी प्रसिद्ध करताना कोणत्याही सभासद /ठेवीदार अथवा कर्जदार/थकबाकीदार यांचा नामोल्लेख होणार नाही याची काटेकोरपणे दक्षता घेण्यात यावी

उपरोक्त सर्व सुचनांचे काटेकोर पालन करुनच, राज्यातील नागरी व ग्रामीण बिगर शेती / पगारदार सहकारी पतसंस्थांना आर्थिक पत्रके प्रसिद्धी व प्रकटीकरण लागु करणेबाबत सर्व संबंधितांनी आवश्यक कार्यवाही करावी. सदर सुचनांचे उल्लंघन करणा-या संबंधित नागरी व ग्रामीण बिगर शेती / पगारदार सहकारी पतसंस्था महाराष्ट्र राज्य सहकारी संस्था अधिनियम १९६० व महाराष्ट्र राज्य सहकारी संस्था नियम १९६१ मधील संबंधित तरतुदीनुसार कारवाईस पात्र राहतील, याची नोंद घ्यावी. सदर सुचनांनुसार कार्यवाही झाली किंवा नाही याबाबत संबंधित वैधानिक लेखापरीक्षकांनी आपल्या लेखापरिक्षण अहवालात उचित ठिकाणी स्पष्ट अभिप्राय नोंदविणे आवश्यक आहेत.

सदर नुसार कार्यवाही न करणारे संबंधित वैधानिक लेखापरिक्षक हे उचित वैधानिक कारवाईस पात्र राहतील. सर्व जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था व जिल्हा विशेष लेखापरीक्षक वर्ग-१, सहकारी संस्था यांनी सदरच्या सूचना आपले कार्यक्षेत्रातील सर्व नागरी व ग्रामीण बिगर शेती / पगारदार सहकारी पतसंस्था व सहकार विभागाच्या नामतालिकेवरील सर्व लेखापरीक्षकांच्या निर्दशनास आणुन देण्याची कार्यवाही करावी.

(दिपक तावरे भा.प्र.से.)
**अध्यक्ष,**
महाराष्ट्र राज्य बिगर कृषी सहकारी पतसंस्था
नियामक मंडळ तथा सहकार आयुक्त व निबंधक,
सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे

**प्रति,**

१. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, (सर्व).
२. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, (लेखापरीक्षण), (सर्व).
३. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, (सर्व).
४. जिल्हा विशेष लेखापरीक्षक, सहकारी संस्था, (सर्व).
५. दि इन्स्टीटयुट ऑफ चार्टर्ड अकौंटंटस ऑफ इंडिया, WIRC, बि.के.सी., बांद्रा, मुंबई-४०००५१.
६. दि इन्स्टीटयुट ऑफ कॉस्ट अॅन्डवर्क्स अकौंटंटस ऑफ इंडिया, जन्मभूमीमार्ग, फोर्ट, मुंबई.
७. अध्यक्ष/सचिव, ऑडीटर्स कौन्सिल अॅन्ड वेलफेअर असो., पुणे
(प्रमाणित लेखापरीक्षकांची राज्यस्तरीय संघटना)
८. अध्यक्ष/सचिव, महाराष्ट्र राज्य को-ऑप.ऑडीटर्स महासंघ, पुणे
(प्रमाणित लेखापरीक्षकांची राज्यस्तरीय संघटना)
१०) प्रमाणित लेखापरीक्षकांच्या जिल्हास्तरीय संघटना (सर्व),
११) अध्यक्ष /मुख्य कार्यकारी अधिकारी,............................ (सर्व पतसंस्था फेडरेशन)
(राज्य/ विभागीय / जिल्हा/ तालुका )
१२) अध्यक्ष /मुख्य कार्यकारी अधिकारी/ व्यवस्थापक /सचिव ,........................... नागरी/ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था मर्या. ...............तालुका ................जिल्हा .......

**प्रत, माहितीस्तव -**

१) पर्यवेक्षकीय अधिकारी (सर्व), मुख्यालय, पुणे
२) कार्यासन अधिकारी, माहिती व तंत्रज्ञान शाखा, मुख्यालय,पुणे
(कार्यालय संकेतस्थळावर प्रसिध्दीस्तव)
३) निवड नस्ती.

**प्रत - माहितीस्तव सविनय सादर,**

मा.प्रधान सचिव (सहकार व पणन), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, महाराष्ट्र राज्य,मुंबई-३२.